**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाइन्स, नागपूर ४४०००१**

---

**ई-मेलव्दारे** क्रमांक : कक्ष-१०(२)/आस्था/एक/निवडणूक सेवा/प्र.क्रं.१६८(१८-१९)/ 9122
नागपूर ४४०००१, दिनांक: 30/9/2019

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
सर्व

विषय:- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, २०१९
क्षेत्रीय कर्मचारी यांची निवडणूक कामात सेवा न घेणेबाबत

संदर्भ:- १) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/निवडणूक सेवा/प्र.क्र. १६८(१८-१९)/२४६, दिनांक ११/९/२०१९

२) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील पत्र क्र. जीईएन-२०१९/प्र.क्र.११४२/१९/३३, दिनांक २५/९/२०१९

३) शासन पत्र क्र. एफएसटी-०९/१९/प्र.क्र.२४६/फ-४, दिनांक ३०/९/२०१९

भारतीय निवडणूक आयोग यांचे कडील पत्र दिनांक २६/१२/२००८, दिनांक २८/२/२०१४ व भारतीय निवडणूक आयोग यांचे माहे फेब्रुवारी २०१९ मधील हँडबुक फॉर रिटर्निंग ऑफिसर मधील डॉक्युमेंट २३ एडिशन १ पुस्तकातील पान क्र. ५१ मधील मुद्दा क्र. ३.३.२ नुसार तसेच उच्च न्यायालयाने दिनांक ९/४/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार संदर्भिय पत्र क्र. १ दिनांक ११/९/२०१९ अन्वये वनविभागातील वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक यांना निवडणूक कामातून वगळणेबाबत शासनास विनंती करण्यात आली होती.

त्यानुसार, वन विभागातील क्षेत्रीय कार्यालयातील वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना निवडणूक विषयक कामकाजातून सुट देण्याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील संदर्भित पत्र क्र. २ अन्वये जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व) यांना निर्देशित केले आहे. संदर्भित पत्र क्र. २ ची प्रत यासोबत आवश्यक कार्यवाहीस्तव सहपत्रित करण्यात येत आहे.

सदरील बाब आपले अधिनस्त सर्व कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व त्यानुसार कार्यवाही करावी.

सहपत्र:- संदर्भ क्र. २ ची प्रत

(विकास गुप्ता)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुय्यम संवर्ग)

e:\rimod 10\सेवाप्रवेश नियम, प्रस्ताव इत्यादी\निवडणूक मध्ये वनविभागाचे सेवा न घेणेबाबत.docx



Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र शासन

क्रमांक:एफएसटी-०९/१९/प्र.क्र.२४६/फ-४
महसूल व वन विभाग,मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२
दिनांक: ३० सप्टेंबर, २०१९

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय: निवडणूक मध्ये क्षेत्रिय कर्मचाऱ्यांची सेवा न घेण्याबाबत.
संदर्भ: प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांचे कक्ष १० (२)/आस्था /एक /निवडणूक सेवा /प्र.क्र.२४ (१८-१९) /२४६, दि.११.०९.२०१९

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, वन विभागातील क्षेत्रिय कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना निवडणूक विषयक कामकाजातून वगळणेबाबत प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने वन विभागातील क्षेत्रिय कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना भारत निवडणूक आयोग यांचे दि.२६.१२.२००८ रोजीचे पत्र व मा.उच्च न्यायालय यांच्या दि.०९.०४.२०१९ रोजीच्या आदेशानुसार निवडणूक कर्तव्यापासून सूट देण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२५.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. (सोबत प्रत जोडली आहे.)

(बा.सि.शिंदे)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

f:\f4 - 2019\note\election\निवडणूक मध्ये वनविभागाचे सेवा न घेणेबाबत.docx

Scanned with OKEN Scanner

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक : जोईएन-२०१९/प्र.क्र.११४२ /१९/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ सप्टेंबर, २०१९.

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

विषय : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, २०१९
मध्ये वन क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्याबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोगाने दिनांक २१.०९.२०१९ च्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे विधानसभा निवडणुकीची घोषणा केलेली आहे. या निवडणुकीकरिता वन विभागातील क्षेत्रीय कार्यालयातील वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक विषयक कामकाजातून वगळण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. वन विभागातील क्षेत्रीय कार्यालयातील वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना निवडणूक विषयक कामकाजातून वगळण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे पत्र दिनांक २६.१२.२००८ च्या पत्रान्वये निर्देश आहेत. तसेच याबाबत मा. उच्च न्यायालयाने दि. ९.४.२०१९ अन्वये आदेश पारित केलेले आहेत. (आदेशाची प्रत सोबत जोडली आहे) त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यापासून सूट देण्यात यावी, ही विनंती.

आपला,

( अ. ना. वळवी )
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

सोबत : वरीलप्रमाणे



Scanned with OKEN Scanner